**शासकीय जमा लेखांकन प्रणाली (GRAS) चा वापर करण्याबाबत**

क्र.का.५/प्र.क्र.७०/०४/२२५/११
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय, पुणे
दिनांक - २३/०२/२०१७

विषय :- फ्रँकिंग मशिन द्वारे मुद्रांक विक्री करणेबाबत...
लोडींगसाठी आगावू रक्कम भरण्यासाठी GRAS पध्दतीचा अवलंब करण्याबाबत...

परिपत्रक -

राज्यामध्ये फ्रँकिंग मशिनद्वारे मुद्रांक विक्री करण्याकरिता एकुण ३९३ बँकां / संस्थांना फ्रँकिंग परवाने दिलेले आहेत परवानाधारक खाजगी संस्था / बँका (व्हेंडॉर) यांना फ्रँकिंगद्वारे मुद्रांक विक्रीसाठी फ्रँकिंग क्रमांक , सदर लोडींग कोड पुरविण्यासाठी परवानाधानाधारक संस्था / बँका यांचेकडून डी.डी./पे-ऑर्डर अथवा धनादेश स्विकारला जातो. याबाबत शासकीय स्तरावरुन बदल करण्यात येत असून, आपल्या अखत्यारीतील अधिनस्त फ्रँकिंग परवानाधारक मुद्राक विक्रेत्यांना फ्रँकिंग लोडींगसाठी जमा करावयाची रक्कम वर नमूद कार्यपध्दतीसह **इंटरनेट बँकिंगचा वापर करुन जमा लेखांकन प्रणाली (GRAS) (Government Receipt Accounting System)** द्वारे जमा करावयाची सुधारीत प्रणाली तयार करण्यात आली असून, सदर प्रणालीचा अवलंब हा फ्रँकिंग लोडींगची रक्कम प्राधिकृत बँकेद्वारे शासन जमा करणेकरिताची कार्यवाही त्वरीत करण्यात यावी.

सही/-XXX
(एस. चोक्कलिंगम्)
नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक,
महाराष्ट्र राज्य, पुणे

प्रत :- १) सर्व फ्रँकिंग परवानाधारक मुद्रांक विक्रेते.

२) अपर मुद्रांक नियंत्रक, मुंबई.

२/- सदरचे परिपत्रक आपले अखत्यारीतील फ्रँकिंग परवानाधारक मुद्रांक विक्रेते यांना आपले स्तरावरुन वितरीत करावेत.

३) सर्व विभागीय नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक

२/- सदरचे परिपत्रक आपले अखत्यारीतील सर्व सहजिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी व फ्रँकिंग परवानाधारक मुद्रांक विक्रेते यांना आपले स्तरावरुन वितरीत करावेत.

४) सर्व सहजिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी

निर्गमित,

सह नोंदणी महानिरीक्षक तथा
मुद्रांक अधिक्षक, म.रा. पुणे